पुढारी – दि.४ फेब्रुवारी, २०२०

# कौटुंबिक वादातून आत्महत्येचा प्रयत्न, पोलिसांमुळे वाचले प्राण

पुणेः पुढारी वृत्तसेवा

वार शनिवार....वेळ दुपारी एकची....पोलिस आयुक्तालयातील मुख्य नियंत्रण कक्षाचा फोन खणाणतो... हडपसर परिसरातील आदित्यनगर सोसायटीत एका महिलेने विषारी औषध प्राशन करून हाताची नस कापून घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. फ्लॅटचा दरवाजा आतून बंद असून, पोलिसांची मदत हवी आहे, असे समोरील महिला सांगते. अवघ्या काही सेकंदात याची माहिती हडपसर पोलिस ठाण्याला दिली जाते. इकडे नेहमीप्रमाणे हडपसर बीट मार्शलचे कर्मचारी अमोल बाबर व विलास राठोड कर्तव्यावर होते. तत्काळ त्यांना याची माहिती दिली जाते. दोघेही घटनास्थळाकडे रवाना होतात. प्रकरण गंभीर असल्याचा अंदाज आल्यामुळे महिला उपनिरीक्षक राजश्री पाटील इतर कर्मचाऱ्यासह पोहचतात.



आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे प्राण वाचविणारे पोलिस पथक.

यावेळी फ्लॅटचा दरवाजा आतून बंद होता. पोलिसांनी कोणत्याही गोष्टीचा विचार न करता दरवाजा तोडून आत प्रवेश केला असता, एक २९ वर्षीय महिला विषारी औषध प्राशन करून हाताची नस कापून घेतल्याने बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. त्यानंतर तत्काळ महिलेला उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, प्रकृती चिंताजनक असल्यामुळे त्यांना सह्याद्री रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या महिलेवर उपचार सुरू असून, आता प्रकृती स्थीर आहे.

कौटुंबिक वादातून महिलेने आत्महत्येचा प्रयत्न केला होता. मात्र, पोलिसांना माहिती देणाऱ्या महिलेने दाखविलेले प्रसंगावधान व पोलिसांची तत्परता यामुळे आत्महत्या करणाऱ्या एका महिलेचे प्राण वाचविले. पोलिसांनी केलेल्या या कामगिरीमुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, महिलेच्या नातेवाईकांनीदेखील या वेळी पोलिसांचे आभार मानले. ही कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली हडपसर पोलिसांनी केली.

सामना – दि. १८ फेब्रुवारी, २०२०

# कॉसमॉसचे पावणेसहा कोटी परत आणण्यास सायबरला यश

पुणे, दि. १७ (प्रतिनिधी) – कॉसमॉस बँकेच्या सर्व्हरवर सायबर हल्ला करून ट्रान्झॅक्शनद्वारे हाँगकाँग येथील हँगसेन बँकेत वळविलेल्या १३ कोटी ९२ लाखांपैकी ५ कोटी ७२ लाख रुपये परत मिळविण्यात सायबर सेलच्या पोलिसांना यश आले आहे. हाँगकाँग कोर्टाच्या आदेशानंतर पहिल्या टप्प्यात सोमवारी ही रक्कम कॉसमॉस बँकेच्या खात्यात जमा केली आहे, अशी माहिती सायबर सेलचे उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली.

गणेशखिंड रस्त्यावरील कॉसमॉस बँकेच्या मुख्यालयातील सर्व्हरवर सायबर चोरट्यांनी ११ ऑगस्ट २०१८ मध्ये हल्ला केला. त्यानंतर ९४ कोटी ४२ लाख रुपये वळविले होते. यापैकी व्हिसा डेबिट कार्डद्वारे ७८ कोटी रुपये हिंदुस्थानबाहेर काढण्यात आले होते. रूपे डेबिट कार्डद्वारे २ कोटी ५० लाख रुपये हिंदुस्थानातील विविध शहरांत काढले होते. १३ ऑगस्टला स्विफ्ट ट्रान्झॅक्शनद्वारे हाँगकाँग येथील हँगसेन बँकेतील ए. एल. एम ट्रेडिंग लिमिटेड खात्यात १३ कोटी ९२ लाख वळविले होते. याप्रकरणी चतु:शृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात सायबर सेलने १८ आरोपींना अटक केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या वतीने हाँगकाँग दुतावासाशी संपर्क साधून पुणे सायबर पोलीस पाठपुरावा करीत होते. हाँगकाँग कोर्टाने ५ कोटी ७२ लाख ९५ हजार रुपये सोमवारी कॉसमॉसच्या खात्यात पाठविले आहेत. ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे, सहायक निरीक्षक सागर पानमंद, संतोष जाधव, अजित कुऱ्हे, संतोष जाधव यांच्या पथकाने केली.

# कृतज्ञ अश्रूंनी भारावली ‘खाकी’

## मुद्देमाल पुनर्प्रदान कार्यक्रमात पोलिसांकडून नागरिकांना ४३ लाखांचा माल परत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पै-पै एकत्र करून जमा केलेली आयुष्यभराची पुंजी चोरट्यांनी चोरून नेली आणि एका क्षणात होत्याचे नव्हते झाले..., मोठ्या कष्टाने आणि हौसेने केलेले दागिने बसमध्ये चोरले गेले... लग्नात आई-वडिलांनी हौसेने केलेले दागिने चोरीला गेल्याने दोन दिवस रडून काढले... काय करावे, कोणाला सांगावे, नातेवाइकांकडे कसे हात पसरायचे, असे असंख्य प्रश्न मनात घेऊन पोलिसांकडे तक्रार दिली. मात्र, आज पुणे पोलिसांच्या तपासामुळे चोरीला गेलेले दागिने, रोख रक्कम परत मिळाली आहे, असे सांगताना सभागृहात उपस्थित डोळ्यांत अश्रू दिसत होते. हे अश्रू होते आनंदाचे आणि पोलिसांबाबतच्या कृतज्ञतेचे!

निमित्त होते, ते पुणे पोलिसांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या किमती मुद्देमाल पुनर्प्रदान कार्यक्रमाचे. पोलिसांनी विविध गुन्ह्यांमध्ये हस्तगत केलेल्या मुद्देमालाचे वाटप गुरुवारी नागरिकांना करण्यात आले. या वेळी ४३ लाख रुपयांचा मुद्देमाल तक्रारदारांना परत देण्यात आला. पोलिस आयुक्तालयाच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला. सहायक पोलिस आयुक्त विजय चौधरी यांच्या हस्ते मुद्देमाल परत करण्यात आला. चोरीला गेलेल्या गुन्ह्यांचा तपास करून आरोपींकडून जप्त केलेला मुद्देमाल तक्रारदारांना परत केला जातो. पुणे पोलिसांच्या वतीने दर दोन-तीन महिन्यांनी हा कार्यक्रम घेतला जातो. चोरीला गेलेले दागिने, रोख रक्कम परत मिळाल्याने तक्रारदारांच्या चेहऱ्यावरचा आनंद या कार्यक्रमात स्पष्टपणे दिसत होता.




सहायक पोलिस आयुक्त विजय चौधरी यांच्या हस्ते डहाणूकर कॉलनीतील रहिवासी सुचेता आणि मोहन साने यांना त्यांचा चोरीला गेलेला ऐवज परत करण्यात आला.

### महाराष्ट्र पोलिसांच्या कामाचे कौतुक

मध्य प्रदेश येथील रहिवाशी असलेल्या प्रतिभा किराड या दोन वर्षांपूर्वी लग्न करून पुण्यात आल्या. लग्नात आई-वडिलांनी मोठ्या हौसेने दागिने केले. मात्र, घरफोडी झाली आणि मंगळसूत्रासह सर्व चोरीला गेले. पोलिसांत तक्रार दिली आणि त्यानंतर चोरीला गेलेले दागिने मिळाले. ‘महाराष्ट्र पोलिसांचे आजपर्यंत केवळ नावच ऐकले होते. येथे येऊन त्यांचे उत्तम काम पाहिले,’ अशा शब्दांत किराड यांनी पोलिसांचे कौतुक केले.

डहाणूकर कॉलनी येथील रहिवासी सुचेता मोहन साने यांच्या घरी २०१८मध्ये घरफोडी झाली होती. त्या वेळी काही अज्ञात चोरट्यांनी घरातील २५ तोळे सोन्याचे दागिने चोरून नेले. सुचेता साने सेवानिवृत्त आहेत. आयुष्यभर कष्ट करून हौसेने घेतलेले दागिने चोरीला गेल्याने त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्या वेळी नातेवाइकांना काय सांगायचे, मदत कोणाकडे मागायची असा प्रश्न त्यांना पडला. त्यांनी पोलिसांत तक्रार केली. पोलिसांनी तपास करून चोरांना बेड्या ठोकल्या. ‘एका वर्षात गेलेले सर्व दागिने परत मिळाल्याने पोलिसांचे आभार मानावे तेवढे कमीच आहे,’ अशी भावना साने दाम्पत्याने व्यक्त केली.

हॉस्पिटलमधून ‘पीएमपी’ने घरी जात असताना चोरट्यांनी गळ्यातील मंगळसूत्र चोरले. याबाबत पोलिसांत तक्रार दिली. थोड्या दिवसांनी पोलिस ठाण्यातून फोन आला. मंगळसूत्र चोरणारा पकडला गेल्याचे पोलिसांनी सांगितले. आज चोरीला गेलेले स्त्रीधन परत मिळाले आहे. त्यामुळे आम्हाला हायसे वाटत आहे, अशा भावना काही महिलांनी व्यक्त केल्या. या कार्यक्रमात महागडे मोबाइल, दुचाकी, सोने-चांदीचे दागिने, रिक्षा, रोख रक्कम, बोलेरो पिक-अप असा सुमारे ४३ लाख रुपयांचा ऐवज संबंधितांना परत करण्यात आला.

# भेदरलेला मुलगा दोन तासांत पालकांच्या स्वाधीन

## आंबेगाव पठार पोलिसांची कामगिरी; महिलेची सतर्कता आली कामी

आंबेगाव बुद्रुक, दि. १७ (प्रतिनिधी) - पानशेत येथे भेदरलेल्या अवस्थेत सापडलेल्या चिमुकल्या मुलाशी संवाद साधून नाव, गाव समजल्यानंतर अवघ्या दोन तासांत त्याला त्याच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आंबेगाव पोलिसांनी यश मिळवले आहे.

पोलिसांनी याबाबत दिलेली अधिक माहिती अशी की, पानशेत जवळील गावातील दहा वर्षांचा मुलगा सकाळपासून अनवाणी फिरत फिरत आंबेगाव पठार सर्वे नंबर १६ मधील साई सिद्धी चौकातील ओम साईनगर मधील गणपती मंदिराजवळ येऊन कट्ट्यावर शांत पडला होता. तो भेदरलेल्या अवस्थेत होता. मंदिराशेजारी राहात असलेल्या शैला दर्गे यांनी हे पाहिले व आपल्या घराकडे नेऊन त्याला



**आंबेगाव पठार :** सापडलेला मुलगा व त्याच्या पालकासह पोलीस कर्मचारी.

खाऊ देत माहिती विचारली असता त्याने घाबरतच आपले नाव विठ्ठल मरगळे आणि गाव वरघड असल्याचे असल्याचे सांगितले. दर्गे यांनी आंबेगाव पठार पोलीस चौकीशी संपर्क साधून सदर बाब कळविली. त्यानंतर पोलीस नाईक विजय कुंभारकर, पोलीस नितीन जाधव, पोलीस नानासो खाडे हे सर्वजण दर्गे यांच्या घराकडे तातडीने आले. त्या मुलास दर्गे यांनी पोलिसांकडे सुपूर्द केले. पोलीस हवालदार राजेंद्र कचरे यांनी मुलांशी संवाद साधून माहिती घेतली. नाव तसेच गाव समजल्याने सदर वरघड वेल्हे

### नाव आणि गाव सांगितल्याने तपास झाला सोपा

तालुक्यातील असल्याच समोर आले. यावरून आंबेगाव पठार पोलिसांनी वेल्हा पोलीस स्टेशनशी संपर्क साधून सदर मुला विषयी महिती दिली. त्या माहितीनुसार हरवलेल्या मुलाचा पत्ता शोधून अवघ्या दोन तासांत विठ्ठल मरगळे यास त्याच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. मुलगा भेदरलेल्या अवस्थेत असल्याने तो त्या ठिकाणी कसा पोहचला, याबाबत अधिक माहिती मिळू शकली नाही. आंबेगाव पठार पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या या कामगिरीचे परिसरात कौतुक होत आहे.

**पुढारी – दि. २० फेब्रुवारी, २०२०**

# वाहतूक शाखेने राबविले एकाच वेळी २ ग्रीन कॉरिडोर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

वाहतूक शाखेकडून मंगळवारी दुपारच्या सुमारास शहरात एकाच वेळी दोन ग्रीन कॉरिडॉर राबविण्यात आले आहेत. यात रुबी हॉल क्लिनिक ते पुणे विमानतळ आणि रुबी हॉल क्लिनिक ते राधा चौक, म्हाळूंगे बालेवाडी येथे दोन वेगवेगळे ग्रीन कॉरिडॉर करण्यात आले, अशी माहिती वाहतूक शाखेचे अपर पोलिस आयुक्त संजय शिंदे यांनी दिली.

पहिल्या ग्रीन कॉरिडॉरदरम्यान रुबी हॉलमधील एका रुग्णाचे 'हृदय' ॲम्ब्युलन्सद्वारे तात्काळ पुणे विमानतळावर पोहोचविण्यात आले. ८ कि.मी.चा हा प्रवास १४.४३ वाजेपासून ते १४.४९ वाजेपर्यंत असा केवळ ०६ मिनिटात करण्यात आला, तर याच रुग्णाचे 'फुफ्फुस' हे अवयव मुंबईला घेऊन जाण्यासाठी रुबी हॉल क्लिनिक ते राधा चौक, महाळुंगे बालेवाडीपर्यंत तात्काळ पोहोचविण्यात आले.

या दरम्यानचा १४ कि.मी.चा प्रवास दुपारी ३ :०१ वाजेपासून ०३ : १६ वाजेपर्यंत असा १५ मिनिटात करण्यात आला. दोन्ही मार्गावरील कोरेगाव पार्क, येरवडा, विमानतळ, बंडगार्डन, शिवाजीनगर, चतुःशृंगी या वाहतूक विभागाच्या प्रभारी अधिकारी यांनी योग्य तो बंदोबस्त लावला होता. या अगोदर सन २०१९ मध्ये एकुण १७, तसेच, १ जानेवारी २०२० रोजी पासून ३ वेळा वाहतूक शाखेने वेगवेगळ्या मानवी अवयवांचे तात्काळ प्रत्यारोपण करण्याकरीता ग्रीन कॉरिडॉरचे प्रयोग केले असून, ते कमी कालावधीत यशस्वी झाले आहेत, असेही वाहतूक शाखेकडून सांगण्यात आले आहे.

**पुढारी – दि. १५ फेब्रुवारी, २०२०**

# पोलिसांच्या सतर्कतेमुळे दोन चिमुकले सापडले

## माहिती मिळताच दोन तासांत घेतला शोध

**धायरी : पुढारी वृत्तसेवा**

सिंहगडरोड परिसरातील नऱ्हे गावातून बेपत्ता झालेली दोन चिमुकली मुले चोवीस तासांत आईवडिलांच्या कुशीत सुखावली. ही कामगिरी सिंहगडरोड पोलिस ठाण्यातील नऱ्हे पोलिस मार्शल सचिन तुपसौंदर व कॅच्चाप्पा जनवाड यांनी केली.

नऱ्हे पोलिस चौकीत मुले बेपत्ता झाल्याची माहिती मिळताच तत्काळ या दोन मार्शलनी शोधकार्य सुरू करून दोन तासांत बेपत्ता झालेल्या मुलांना शोधून काढले. याबाबत माहिती अशी की, नऱ्हे येथून विजय रामदुलार जैसवार (१२ वर्षे) व संकेत संजीव श्रीवास्तव (१० वर्षे) दोघेही रा. नऱ्हे, ता. हवेली जि. पुणे ही दोन मुले गुरुवार, १३ फेब्रुवारी रोजी रात्री आठ वाजल्यापासून बेपत्ता झाली होती. त्यांचे आईवडील व नातेवाइकांनी सर्वत्र शोध घेतला; परंतु ते सापडले नाहीत.

दरम्यान त्यांच्या आईवडिलांनी अखेर हतबल होऊन दुसऱ्या दिवशी शुक्रवारी दुपारी नऱ्हे चौकीत मुले बेपत्ता झाल्याची माहिती दिली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सिंहगडरोड पोलिसांनी सिंहगड पालक संघटनेचे अध्यक्ष शिवभाऊ पासलकर, कन्हैया जैसवार व नातेवाइकांच्या मदतीने संपूर्ण परिसरात शोध घेतला. सायंकाळी पाच वाजता एका रिक्षात झोपलेल्या या दोन चिमुकल्या मुलांना मार्शल जनवाड व सचिन तूपसौंदर यांनी शोधून काढले.

ही दोन्हीही मुले इयत्ता पाचव्या वर्गात शिकत आहेत. संकेतचे वडील बांधकाम व्यवसाय करतात, तर आई खासगी कंपनीत काम करीत आहे. विजयचे वडील पिठाची गिरणी चालवतात. आई गृहिणी आहे. या दोन्ही मुलांना पोलिसांनी आईवडील व नातेवाइकांच्या ताब्यात दिले. या वेळी सिंहगडरोड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नंदकिशोर शेळके, पोलिस हवालदार विकास मते, संदीप सांगळे आदी उपस्थित होते.



मुलांना आईवडिलांच्या ताब्यात देताना पोलिस पथक.

**पुढारी – दि. १४ फेब्रुवारी, २०२०**

# कौटुंबिक विरहातून आत्महत्या करणाऱ्याचे वाचविले प्राण

**पुणे :** मुलाला माहेरी घेऊन गेलेली पत्नी मुलाशी बोलू देत नसल्याने व मुलाची चार महिने भेट होऊ न शकल्याने आत्महत्या करण्यास गेलेल्या एकाचे प्राण वारजे माळवाडी येथील पोलिस कर्मचाऱ्यांमुळे वाचले आहेत. चांदणी चौक येथे एक व्यक्ती पुलावरून उडी मारून आत्महत्या करत असल्याचा वारजे पोलिसांना समजले. त्यानुसार पोलिस ठाण्याचे कर्मचारी सद्दाम शेख, ऋषिकेश कोळप नाईट राऊंड अधिकारी अशोक येवले तसेच वारजे बीट मार्शल रमेश चव्हाण व फिरोज शेख तेथे गेले. तेव्हा एक व्यक्ती चांदणी चौक ब्रिज वरून खाली उडी मारून आत्महत्या करत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर येवले, सद्दाम शेख, कोळप यांनी वेळ वाया न घालवता त्या व्यक्तीला तेथून खाली ओढून सदरच्या इसमाचा जीव वाचवला. त्यानंतर त्याला तेथून चांदणी चौक ट्राफिक चौक येथे घेऊन आले. त्याची चौकशी केल्यानंतर घरगुती भांडणातून माहेरी निघून गेलेली पत्नी मुलाला भेटू वा बोलू देत नसल्याचा त्रास होत असल्यामुळे आत्महत्या करण्याचा विचार केला असल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर सद्दाम शेख यांनी त्यांच्या घरचा फोन नंबर त्याच्याकडून घेऊन त्याच्या घरी अहमदनगरला फोन लावला व त्याच्या वडिलांना घडलेल्या सदर प्रकाराबाबत सांगितले असता त्यांचे वडील यांनी सांगितले. वडीलांनी त्यांच्या नातेवाईकास पाठवले. दरम्यान पोलिसांनी केलेल्या प्रयत्नामुळे आत्महत्येस गेलेल्या त्या व्यक्तीचे मत परिवर्तन केले. त्यानंतर बावधन पोलीस चौकीच्या मदत घेऊन बावधन मार्शल यांच्या ताब्यात त्या व्यक्तीला दिले. त्या व्यक्तीनेही यापुढे अशा प्रकारे कोणात्याही प्रकार कृत्य करू अशी त्याला समज देण्यात आली. पुणे पोलिस कंट्रोल रूमला याबाबत माहिती देण्यात आली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १५ फेब्रुवारी, २०२०

# 'फेसबुक'च्या आधारे महिलेची घरवापसी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे स्टेशन परिसरात रात्री उशिरा एक महिला रडत बसलेली गस्तीवरील पोलिसांना दिसली. तिच्याकडे चौकशी केल्यानंतर तिने पतीसोबत वाद झाल्यानंतर रागात घरातून निघून आल्याचे सांगितले. पण, तिला आता घराचा पत्ता आठवत नव्हता. तिने सांगितलेल्या पतीच्या नावावरून फेसबुकवर शोध घेतला असता पतीचे फेसबुकवर खाते सापडले. त्यावरून पोलिसांनी महिलेच्या पतीशी संपर्क साधला आणि दोघांचे समुपदेशन करून त्यांना घरी पाठविले.

बंडगार्डन पोलिस ठाण्याचे बीट मार्शल १० फेब्रुवारी रोजी हद्दीत गस्त घालत होते. त्या वेळी पुणे स्टेशन परिसरात रात्री दहाच्या सुमारास एक महिला रडत बसलेली दिसली. पोलिसांनी त्या महिलेकडे चौकशी केली. त्या वेळी तिने पतीसोबत वाद झाले असून, रागाच्या भरात कोणालाही काहीही न सांगता घरातून निघून आल्याचे सांगितले. ती पूर्वी पिंपळे सौदागर येथे राहत होती. मात्र, एक महिन्यापूर्वीच पतीसोबत ती उंड्री परिसरात राहण्यासाठी आली होती. त्यामुळे तिला पत्ता व्यवस्थित सांगता येत नव्हता. ती फक्त पतीचे नाव सांगत होती.

### असा घेतला पतीचा शोध

पोलिस उपनिरीक्षक किरण देशमुख यांनी पतीच्या नावाचे फेसबुकवर काही प्रोफाइल आहे का हे पाहिले. त्या वेळी महिलेच्या पतीच्या नावाची अनेक प्रोफाइल समोर आली. पण, त्यातील एका प्रोफाइलचा फोटो महिलेने ओळखला. तोच पती असल्याचे सांगितले. त्या प्रोफाइलवरून पोलिसांनी महिलेच्या पतीचा पत्ता शोधण्यास सुरुवात केली. तो वडाची वाडी परिसरात असल्याचे समजल्यानंतर तेथील बीट मार्शलच्या मदतीने पतीशी संपर्क केला. पतीला पोलिस ठाण्यात बोलवून घेतले. महिला व तिच्या पतीचे समुपदेशन करण्यात आले. त्यानंतर महिला पतीसोबत जाण्यात तयार झाली. पोलिस उपनिरीक्षक किरण देशमुख व कर्मचारी स्वाती थोरात यांनी ही कामगिरी केली.

सकाळ – दि. २ फेब्रुवारी, २०२०

# हडपसरला पोलिसांमुळे वाचले महिलेचे प्राण

**हडपसर/पुणे, ता. १ :** घरगुती वादातून महिलेने घरात हाताची नस कापून व विषारी औषध घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याचवेळी सजग नागरिकांनी पोलिस नियंत्रण कक्षाला माहिती दिली. नियंत्रण कक्षातून तत्काळ हडपसर पोलिस ठाण्याच्या बीट मार्शल कर्मचाऱ्यांना खबर देण्यात आली. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेऊन महिलेला तत्काळ रुग्णालयात हलविल्याने तिचे प्राण वाचले.

हडपसर पोलिस ठाण्याचे बीट मार्शल अमोल बाबर व विलास राठोड हे दोघे शनिवारी गस्त घालत होते. दुपारी एकच्या सुमारास त्यांना नियंत्रण कक्षामधून फोन आला. हडपसरमध्ये राहणाऱ्या एका महिलेने आत्महत्या करण्याच्या उद्देशाने राहत्या घरामध्येच विषारी औषध घेतले असल्याची माहिती त्यांना मिळाली. बाबर व राठोड हे दोघे तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्याचवेळी महिला पोलिस उपनिरीक्षक राजश्री पाटील याही घटनास्थळी पोचल्या. मात्र महिलेने घराच्या दरवाजाला आतून कडी लावली होती. प्रयत्न करूनही कडी उघडेना. अखेर पोलिसांनी दरवाजा तोडून घरामध्ये प्रवेश केला. त्या वेळी हाताची नस कापल्याने व विषारी औषध घेतल्याने संबंधित महिला बेशुद्ध पडली होती.

पोलिसांनी तत्काळ महिलेला रिक्षातून रुग्णालयात नेले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने तिला तेथून मोठ्या खासगी रुग्णालयामध्ये हलविले. तेथे डॉक्टरांच्या पथकाने तिच्यावर दिवसभर उपचार केले. त्यानंतर सायंकाळी संबंधित महिलेच्या तब्येतीत सुधारणा होण्यास सुरुवात झाली. दरम्यान, महिलेच्या कुटुंबीयांनी पोलिसांचे आभार मानले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश साठे यांनीही पाटील, बाबर व राठोड यांच्या कामगिरीचे कौतुक केले.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १३ फेब्रुवारी, २०२०

# तक्रार दाखल झाल्यानंतर दोन तासांत छडा

येरवडा : 'बारावीची परीक्षा तोंडावर आली असून, अभ्यास कर,' असे म्हणून आई रागविल्याने सतरा वर्षीय मुलगी कोणालाही न सांगता घर सोडून निघून गेली. बराच वेळ शोध घेऊनही ती न सापडल्याने आईने येरवडा पोलिस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी मुलीच्या मोबाइल क्रमांकावरून तिचे 'लोकेशन'शोधले असता ती मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनलवर असल्याचे समजले. येरवडा पोलिसांनी तत्काळ मुंबई पोलिस आणि रेल्वे पोलिसांकडे मदतीची मागणी केली आणि तक्रार दाखल झाल्यानंतर दोन तासांत पोलिसांनी मुलीला सुखरूप नातेवाइकांकडे दिले.

येरवडा परिसरात संबधित मुलगी आणि तिचे कुटुंब राहण्यास आहे. बारावीची परीक्षा तोंडावर आल्याने सोमवारी १० फेब्रुवारी रोजी सकाळी आईने मुलीला अभ्यास कर म्हणून रागाविले. त्यानंतर आई कामाला निघून गेली. आईच्या ओरडण्याचा राग आल्याने मुलीने कोणाला काहीही न सांगता कॉलेजच्या बॅगमध्ये कपडे भरून, सोबत एक हजार रुपये घेऊन घर सोडले आणि थेट मुंबई गाठली. कामावरून रात्री आई घरी आल्यावर बराच वेळ शोध घेऊनही मुलगी सापडली नाही. यामुळे त्यांनी पोलिसांत तक्रार दिली.

### असा लावला तपास

सहायक पोलिस निरीक्षक समीर करपे आणि बलभीम ननावरे यांनी शाळकरी मुलगी हरविल्याच्या प्रकरणाची दखल घेऊन तपासाला सुरुवात केली. मुलीच्या मोबाइल क्रमांकाचे 'लोकेशन'तपासल्यानंतर ती मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनलवर असल्याचे दिसून आले. येरवडा पोलिसांनी तत्काळ आझाद मैदान पोलिस ठाणे आणि मध्य रेल्वे पोलिसांशी संपर्क साधून मुलगी घर सोडून स्थानकावर आल्याची माहिती दिली. मुलीचा फोटो मुंबई आणि रेल्वे पोलिसांना पाठविल्यानंतर त्यांनी त्वरित मुलीचा शोध घेतला आणि नातेवाइकांच्या ताब्यात दिले.

पुढारी – दि. १८ फेब्रुवारी, २०२०

# पोलिसांच्या प्रयत्नाने वाचले ज्येष्ठाचे प्राण

**पुढारी : वृत्तसेवा**

सिंहगड रोड परिसरातील वडगाव खुर्द येथील कॅनॉलच्या पाण्यात पडलेल्या ज्येष्ठ नागरिकाचे सिंहगड रोड पोलिस व स्थानिक युवकांनी केलेल्या प्रयत्नांमुळे प्राण वाचले. कॅनॉलच्या पाण्यात पडून मोहन ज्योतिबा शिंदे (६० वर्षे, रा. श्रीराम चौक, वारजे, पुणे) प्रवाहात वाहत जात असताना त्यांचे प्राण वाचविण्यात सिंहगड रोड पोलिस व स्थानिक युवकांना यश आले.

शिंदे हे सोमवारी सकाळी सात वाजता फिरण्यासाठी बाहेर पडले. फिरत फिरत वडगाव खुर्द परिसरात कॅनॉलजवळून जात असताना पाण्यात पडले. त्यांना पाण्याच्या बाहेर निघता येईना. दरम्यान येथे असलेल्या नागरिकांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधला. यावेळी सिंहगड रोड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक हणमंत ननावरे यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी धाव घेतली. त्यांना पाण्यातून बाहेर काढले. त्यांच्यावर प्रथमोपचार केल्यावर ते शुद्धीवर आल्यावर त्यांचे नाव, पत्ता कळला. त्यांच्या घरच्यांशी संपर्क साधून त्यांना घरच्यांच्या स्वाधीन केले.

लोकमत – दि. २३ फेब्रुवारी, २०२०

# ...अन् २५ तोळे हाती पडताच आले आनंदाश्रू

## महिलांनी व्यक्त केल्या भावना : मुद्देमाल पुन:प्रदान समारंभ; ४० गुन्ह्यांतील जप्त माल परत

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : निवृत्तीनंतर ऐन वेळी जर काही अडचण आली, तर हाताशी असावेत म्हणून एक-एक तोळा सोने घेऊन दागिने खरेदी केले होते. फिरायला गेल्याचे पाहून चोरट्यांनी घर धुऊन नेले. पोलिसांनी मेहनत घेऊन चोरट्यांना पकडले आणि आज आमचे चोरीला गेलेले २५ तोळे दागिने पुन्हा परत मिळाले... डहाणकर कॉलनीत राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिक सुचेता साने सांगत होत्या. दागिने पाहून त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले होते. निमित्त होते, पुणे पोलिसांनी आयोजित केलेल्या गुन्ह्यांमध्ये हस्तगत केलेला मुद्देमाल पुन:प्रदान कार्यक्रमाचे.

पुणे शहरात झालेल्या विविध घटनांमध्ये चोरीला गेलेल्या ४० गुन्ह्यांतील मुद्देमाल गुरुवारी समारंभपर्वक फिर्यादींना परत करण्यात आला. शहरातील पोलीस ठाण्यांकडून जप्त केलेला ४२ लाख ५३ हजार रुपये आणि सायबर पोलीस ठाण्यांकडील ८० लाख ३७ हजार रुपये असा १ कोटी २२ लाख रुपयांचा ऐवज नागरिकांना परत करण्यात आला. आतापर्यंत गेल्या ५ कार्यक्रमांत तब्बल १६ कोटी १५ लाख रुपयांचा ऐवज परत करण्यात आला आहे. या वेळी अनेक नागरिकांनी पोलिसांप्रति कृतज्ञता व्यक्त केली.

हडपसर येथील रसिका वनवे या कमांड हॉस्पिटलमधून घरी जात असताना त्यांच्या पर्समधील दागिने महिला चोरट्यांनी लांबविले होते. १० महिन्यांनंतर ते त्यांना परत मिळाले. सहायक पोलीस आयुक्त विजय चौधरी यांच्या हस्ते फिर्यादींना त्यांचा ऐवज परत देण्यात आला. या वेळी सर्वाधिक मुद्देमाल हस्तगत करण्याची कामगिरी करणाऱ्या पोलिसांना प्रशस्तिपत्रक देऊन गौरवण्यात आले.

### पोलिसांनी विश्वास दिला... आनंद शब्दात सांगू शकत नाही!

मूळच्या मध्य प्रदेशाच्या प्रतिमा किराड यांनी सांगितले, की महाराष्ट्र पोलिसांचे नाव यापूर्वी ऐकले होते; पण आज प्रत्यक्ष त्यांचे काम पाहून अभिमान वाटला. आम्ही दोघेच पती-पत्नी कोंढव्यात राहतो. दोघेही कामाला जातो. कामाला गेलो असताना घरफोडी झाली. सायंकाळी घरी आल्यावर हे आम्हाला समजले.

पोलीस तत्काळ घरी आले. त्यांनी सर्व माहिती घेतली. आमच्या लग्नाला दोनच वर्षे झाली आहेत. माहेरकडून आणि सासरकडून मिळालेले सर्व सोन्याचांदीचे दागिने चोरट्यांनी लंपास केले होते. अगदी माहेरचे मंगळसूत्रही आपल्याला घालायला घरात शिल्लक नव्हते; पण पोलिसांनी विश्वास दिला.

या दिवाळीत धनतेरसच्या दिवशीच पोलिसांचा फोन आला आणि चोरटे सापडले असून तुमचे दागिनेही मिळाल्याची आनंदवार्ता त्यांनी दिली. त्यानंतर सर्व प्रक्रिया पार पाडून आज आमच्या हातात हे दागिने परत मिळाले आहे. हा आनंद शब्दात वर्णन करण्यासारखा नाही.